-23-

शासन सेवेत नियुक्तीसाठी प्रकल्पग्रस्तांसाठी असलेल्या 5% आरक्षणामध्ये भूकंपग्रस्तांचा समावेश करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसुल व वन विभाग
क्रमांक : ईक्युआर1094/प्र.क्र.768/भूपुक-1
मंत्रालय, मुंबई 400 032.
दिनांक : 9 ऑगस्ट 1995

वाचा : 1) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही1094/प्र.क्र.30/16अ दिनांक 17 नोव्हेंबर 1994.

**शासन निर्णय**

दिनांक 17 नोव्हेंबर 1994 च्या उपर्युक्त शासन निर्णयान्वये शासन सेवेत नियुक्तीसाठी महाराष्ट्र राज्यातील विविध प्रकल्पग्रस्त व्यक्तींसाठी असलेल्या 5% आरक्षणामध्ये राज्यातील भूकंपग्रस्त व्यक्तींचा समावेश करण्यात यावा असा निर्णय शासनाने घेतला असून भूकंपग्रस्तांना आरक्षणाचा लाभ देण्यासंदर्भात आवश्यक ते संनियंत्रण जिल्हाधिका-यामार्फत करण्यांत येईल. जिल्हाधिका-यांनी खालील मार्गदर्शक बाबींच्या अधीन राहून प्रकरणे तपासावी व निर्णय घ्यावा.

अ) भूकंपग्रस्तांची व्याख्या :- भूकंपग्रस्तांच्या बाबतीत व्यक्तीगत विचार न करता कुटुंबाचा विचार करण्यांत येऊन भूकंपग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीस नोकरीविषयी सवलत देण्यांत यावी. भूकंपग्रस्त कुटुंब ठरविताना खालील बाबी विचारात घ्याव्यात.
   1) लातूर व उस्मानाबाद जिल्हयातील जी 52 गावे पूर्णपणे उध्वस्त झाली आहेत त्यातील कुटुंबे,
   2) ज्यांची घरे पूर्णतः उध्वस्त झाली आहेत,
   3) ज्यांच्या व्यवसायांची जागा अथवा व्यवसाय पूर्णपणे उध्वस्त झाले असल्याने जगण्याचे साधन नष्ट झाले आहे.

ब) भूकंपग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबाची व्याख्या :- "महाराष्ट्र प्रकल्पग्रस्त व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम 1986" च्या कलम 6 (सी)मध्ये दर्शविल्याप्रमाणे कुटुंबामध्ये पती/पत्नी/मुलगा व अविवाहित मुलगी कुटुंबात राहणारे व कुटुंबप्रमुखावर अवलंबून असणारे भाऊ व बहिण, नातु आणि सून यांचा समावेश होतो.

क) भूकंपग्रस्तांच्या पुनर्वसनासंदर्भात भूकंपग्रस्त असल्याचा दाखला देण्याचा अधिकार जिल्हाधिकारी यांजकडे राहील.

ड) प्रकल्पग्रस्त व्यक्ती व भूकंपग्रस्त व्यक्ती यांस संयुक्तपणे 5% जागा आरक्षित केल्यामुळे या दोहोपैकी एकास नेमणूक द्यावयाची झाल्यास भूकंपग्रस्त व्यक्तीस प्राधान्य द्यावे. तथापि प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होऊ नये, यासाठी या आरक्षणांची उपलब्ध 5 जागांपैकी 3 जागा भूकंपग्रस्त व 2 जागांवर प्रकल्पग्रस्त या प्रमाणात नियुक्त्या द्याव्यात.

इ) भूकंपग्रस्तांना प्रकल्पग्रस्तांप्रमाणेच शासन सेवेत "क" व "ड" गटातील पदावर नियुक्तीसाठी (लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील) उच्च वयोमर्यादेत 3 वर्षे इतकी सूट देण्यांत यावी. त्याचप्रमाणे प्रकल्पग्रस्तांसाठी प्रादेशिक निवडमंडळाच्या कक्षेतील 5% नेमणूका निवडमंडळाच्या कक्षेतून वगळण्यांत आल्या आहेत, त्यामध्ये भूकंपग्रस्तांचाही समावेश करण्यात यावा.

जिल्हाधिकारी कार्यालय
लातूर
24 AUG 1995
312314७
शाखा-
म. जि. नि. उ. जि. जिल्हाधिकारी

एच ९०४ (५००-८-९५)

फ) जिल्हाधिकारी यांच्याकडील प्रकल्पग्रस्तांच्या प्रतिक्षायादीमध्ये वेळोवेळी प्रमाणित होणा-या भूकंपग्रस्त व्यक्तींचा समावेश करण्यांत येऊन नोकरी विषयक सवलतींसाठी प्रतिक्षायादीतील क्रमानुसार शिफारस करण्यांत यावी व या नेमणूकीवर जिल्हाधिका-यांनी संनियंत्रण ठेवावे.

महाराष्ट्रांचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( डॉ. प्र. पं. भिसे )
कार्यासन अधिकारी,
भूकंप पुनर्वसन कक्ष.

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.